आशियातील सर्वात मोठ्या स्वयंसेवी ग्राहक संघटनेचे मुखपत्र

RNI No. MAHBIL/2011/39044

वर्ष १२ | अंक ०६ | सप्टेंबर २०२३ | मूल्य रु. ५/-

मुंबई ग्राहक पंचायत

ग्राहक हिताय
ग्राहक सुखाय

# Grahak Tituka Melwawa

# ग्राहक तितुका मेळवावा

Consumers International
Member of
Consumers International



## गणपति बाप्पा मोरया

## तुझ्या दर्शने उजळो पर्यावरण!

## पंचायत पेठ वेळापत्रक

| | | | |
|---|---|---|---|
| १. | ८ सप्टेंबर ते १२ सप्टेंबर २०२३ | स्वामी मुक्तानंद हायस्कूल, एल.यु.गडकरी हॉल, एन.जी. आचार्य मार्ग, सुभाष नगर, चेंबूर (पू.) | ५ दिवस |
| २. | ३० सप्टेंबर ते ८ ऑक्टोबर २०२३ | सूर्यवंशी क्षत्रिय हॉल, स्वातंत्र्यवीर सावरकर मार्ग, दादर (प.) | ९ दिवस |
| ३. | ९ ऑक्टोबर ते १६ ऑक्टोबर २०२३ | कांती विसारिया हॉल, गावदेवी मैदानाजवळ, नौपाडा, ठाणे (प.) | ८ दिवस |
| ४. | १७ ऑक्टोबर ते २२ ऑक्टोबर २०२३ | सिंफनी बँक्वेट हॉल, विजयनगर सहनिवास, सहार रोड, अंधेरी (पू.) | ६ दिवस |
| ५. | २३ ऑक्टोबर ते २९ ऑक्टोबर २०२३ | गणपतराव वर्तक हॉल, पारनाका, वसई (प.) | ७ दिवस |
| ६. | ३० ऑक्टोबर ते ७ नोव्हेंबर २०२३ | भाटियावाडी हॉल, बाभई नाका, बोरीवली (प.) | ९ दिवस |

# पालघर पेठ






मनमुराद खरेदीत दंग झालेले पालघरकर!





गणपती कार्यशाळेत रममाण झालेली बच्चेकंपनी!

## मुंबई ग्राहक पंचायत

**विश्वस्त मंडळ**
डॉ. बाळ फोंडके
अनुराधा गोरे
ललिता कुलकर्णी
अनुराधा नरसाळे
संजीव मंत्री

**अध्यक्ष**
डॉ. बाळ फोंडके

**उपाध्यक्ष**
अनुराधा गोरे

**कार्यकारी मंडळ**
ॲड. शिरीष देशपांडे (कार्याध्यक्ष, स्वीकृत)
अनुराधा देशपांडे (कार्योपाध्यक्ष)
प्रभाकर गवाणे (कार्योपाध्यक्ष)
अनिता खानोलकर (कार्यवाह)
ज्योती मोडक (कार्यवाह)
रविंद्र सहस्रबुद्धे (खजिनदार)

**सभासद**
छाया वारंगे, शीला देवळेकर,
राजेंद्र राणे, शुभदा चौकर,
मंगला गाडगीळ, अनघा आचरेकर,
विवेक केळकर, शर्मिला रानडे,
आलोक हर्डीकर (स्वीकृत),
अभय जोशी, पराग रेडकर,
अर्चना पानगांवकर (स्वीकृत),
प्रकाश पाटील, उदय पिंगळे (स्वीकृत)

**निमंत्रित**
*• संघटन विभाग प्रमुख*


या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी संपादक/संघटना सहमत असतीलच असे नाही.

# अनुक्रमणिका

ग्राहक तितुका मेळवावा
१ सप्टेंबर २०२३
निज श्रावण/भाद्रपद १९४५


| | |
|---|---|
| पालघर पंचायत पेठ संपन्न | ४ |
| संपादकीय | ५ |
| जागतिक परिषदेत MGP चा प्रभाव! | ६ |
| 'समेट'मुळे दिलासा | ७ |
| औषधांवर बारकोड – का, कशासाठी? | ८ |
| इ कॉमर्स – तक्रार अशी सुटली | १० |
| 'भरड धान्ये – शाकाहारी आहारातील ऊर्जा केंद्र' | ११ |
| आनंददायी वर्षासहल! | ११ |
| मुंबई ग्राहक पंचायत पेठ दालन तक्ता – (दादर) | १२ |
| चेंबूर विभागाची सहल | १४ |
| वाचू आनंदे | १५ |
| विलेपार्ले विभागात वार्षिक मेळावा संपन्न | १६ |
| राजगिरा (Amaranth) | १८ |
| आणि कापडी पिशव्या सजल्या! | १९ |
| Market is up, but my portfolio is down | २० |
| Housing Societies Queries | २१ |
| MGP takes its 'Mission Global ODR' to Germany | २२ |
| MGP's Suggestion Finds Place in Revised Mediation Bill | २३ |
| चेंबूर येथे प्रथमच पंचायत पेठेचे आयोजन | २४ |
| सेतू बांधा रे! | २४ |


**आपल्या संस्थेच्या सभासदांनी एकत्र यावे, ओळखी व्हाव्यात, परस्पर संवाद व्हावा यासाठी विभागीय पातळीवर सभा, वार्षिक मेळावे, विविध उपक्रम आयोजित केले जातात. ते आयोजित करण्यासाठी स्थानिक पातळीवरील कार्यकर्ते स्वयंसेवी वृत्तीने आणि स्फूर्तीने पुढाकार घेऊन मेहनतीने आयोजन करतात. त्यांना तुमचा प्रतिसाद हवा असतो. तुम्ही आवर्जून सहभागी होताय ना? मुंबई ग्राहक पंचायत हे एक कुटुंब आहे, या भावनेने सामील व्हा!**


❖ संपादक :– शुभदा चौकर
❖ संपादकीय साहाय्य :– सुमिता चितळे, नेहा जोशी, शर्मिला नाईक, उदय पिंगळे
❖ सल्लागार :– ॲड. शिरीष देशपांडे, वसुंधरा देवधर
❖ मुखपृष्ठ :– राजेंद्र राणे
❖ अक्षरजुळणी व रचना, कला व मुद्रण :– इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई

Printed & Published by **NISHIKANT VINAYAK GURJAR** on behalf of **Mumbai Grahak Panchayat,** Printed at India Printing Works, 42 G. D. Ambekar Marg, Wadala, Mumbai - 400 031 and Published at Mumbai Grahak Panchayat, Grahak Bhawan, Sant Dnyaneshwar Marg, JVPD Scheme, Juhu, Vile Parle (West), Mumbai - 400 056 Ph.: 26288624, 26281832, Fax : 26250916. • Email : mpanchayat@gmail.com • Vitaran Email : mgpvitaran@yahoo.co.in • Website: **https//www.mymgp.org** • Editor : **Shubhada Chaukar**

# पालघर पंचायत पेठ संपन्न

– मधुसूदन विद्याधर जोशी

मुंबई ग्राहक पंचायत आयोजित पालघर पंचायत पेठेचा शुभारंभ १७ ऑगस्ट रोजी, पालघर येथील लायन्स क्लबच्या हॉलमध्ये झाला. या समारंभास उद्घाटक लाभले होते ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते धनेश भास्कर वर्तक. कार्यक्रमाच्या अध्यक्ष होत्या पंचायत पेठांच्या प्रमुख अनुराधा देशपांडे. व्यासपीठावर मुंबई ग्राहक पंचायतीच्या कार्यवाह अनिता




खानोलकर, पालघर विभागाच्या कार्याध्यक्षा सुनंदा तोडणकर व पालघर वितरण केंद्राचे कार्याध्यक्ष दीपक भंडारी विराजमान होते. या कार्यक्रमात मुंबई ग्राहक पंचायतीचे मध्यवर्ती कार्यकारिणी सदस्य, संपूर्ण पंचायत पेठ समिती व अनेक ज्येष्ठ कार्यकर्त्या उपस्थित होत्या, तसेच बोईसर विभागातून सुद्धा या पेठेच्या मदतीसाठी कार्याध्यक्ष आणि कार्यवाह उपस्थित होत्या.

मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून या पेठेचा शुभारंभ झाला. पालघर विभागाच्या कार्याध्यक्ष सुनंदा तोडणकर यांनी प्रास्ताविक करून सर्वांचे स्वागत केले. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे धनेश वर्तक यांनी या पेठेचे औपचारिक उद्घाटन केले.

आपल्या उद्घाटन पर व्याख्यानात मा. धनेश वर्तक यांनी मुंबई ग्राहक पंचायत करत असलेल्या ग्राहक चळवळीचे अनेक पैलू उलगडून दाखवले. संस्था सातत्याने गेली ४८ वर्षे करत असलेले कार्य हे खरोखरच प्रत्येकाला अभिमानास्पद वाटणारे आहे. चोखंदळ कार्यकर्ते आणि चोखंदळ ग्राहक ह्यांच्या एकत्र येण्याने पालघरची ही पेठ नक्कीच यशस्वी होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

संस्थेच्या कार्यवाह अनिता खानोलकर ह्यांनी पंचायत पेठेला शुभेच्छा दिल्या. पालघर वितरण केंद्राचे कार्याध्यक्ष दीपक भंडारी ह्यांनीसुद्धा ह्या पंचायत पेठेला शुभेच्छा दिल्या.

पंचायत पेठ प्रमुख आणि कार्यक्रमाच्या अध्यक्षा अनुराधा देशपांडे ह्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात पंचायत पेठा, त्यांची उद्दिष्टे ह्याचा थोडक्यात आढावा घेतला. पालघर विभागाचे हे २५वे वर्ष आणि पंचायत पेठेचे हे ४थे वर्ष आहे. पंचायत पेठा हा नुसता खरेदी-विक्रीचा उपक्रम नाही, इथे ग्राहक संरक्षण, ग्राहक शिक्षण, संघटन, पर्यावरण असे विविध विभाग कार्यप्रवण होतात आणि खऱ्या अर्थाने ही ग्राहक रक्षणाची ग्राहक पेठ ठरते, असे त्यांनी सांगितले.

ह्या पंचायत पेठांना जोडून एक नवीन सामाजिक पेठ भरवून संस्था पंचायत पेठांना नवीन आयाम जोडत आहे. ह्यावर्षी अंधेरी येथे संपन्न होणाऱ्या पंचायत पेठेला जोडून वंचित वर्गासाठी कार्य करणाऱ्या विविध सामाजिक संस्थांची 'सेतू बांधा रे!' शीर्षकाखाली दोन दिवसांची पेठ संपन्न होत आहे. ह्या पेठेला सर्वच भौगोलिक विभागांनी नक्की भेट देऊन अशा संस्थांना प्रोत्साहीत करण्याचे आवाहन अनुराधाताईंनी उपस्थितांना केले. शेवटी विनय पाटील सरांनी आभार प्रदर्शन करून हा पंचायत पेठेचा उद्घाटन सोहळा संपन्न झाला.

ह्या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ कार्यकर्ते मधुसूदन जोशी ह्यांनी केले.

या पेठेदरम्यान तीन कार्यशाळा घेण्यात आल्या. पर्यावरण विषय कार्यशाळेसाठी पर्यावरणाण विभाग प्रमुख पराग रेडकर व मंजिरी मोघे उपस्थित होत्या, स्थानिक कार्यकर्त्यांनी सुद्धा ह्या कार्यशाळेत सहभाग नोंदवला. कचऱ्याचे व्यवस्थापन व पर्यावरण पूरक जीवनशैलीची माहिती या कार्यशाळेतून देण्यात आली.

१९ ऑगस्ट रोजी 'टाकाऊतून टिकाऊ' ही कार्यशाळा घेण्यात आली. विनय पाटील, प्रतीक्षा पाटील, गौरांगी पाटील, प्रफुल्ल घरत, वैशाली पारवेकर यांसह इतर अनेक कार्यकर्त्यांनी ह्या कार्यशाळेच्या आयोजनात भाग घेतला. नारळाच्या करवंट्या, दगड, फुटलेले काचेचे ग्लास वगैरे वापरून त्यापासून शोभिवंत वस्तू बनविण्याची ही कार्यशाळा होती.

२० ऑगस्ट रोजी शाडूच्या माती पासून विविध मूर्ती कशा कराव्यात, हे शिकविले गेले. यामध्ये साधारण २२ लहान मुलांनी भाग घेतला. कार्यकर्त्यांच्या मार्गदर्शनाखाली

*(पान क्र. ७ पाहा...)*

संपादकीय

# संघटन में शक्ती है!

**या**वेळचे संपादकीय लिहायला बसले आहे, एक भारतीय म्हणून अभिमानाने ऊर भरलेल्या अवस्थेत! भारताच्या 'चांद्रयान३' ने नुकतेच चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर पाय रोवले आहेत. हा 'विक्रम' टीव्हीवर बघताना प्रचंड आनंद झाला. प्रत्येक भारतीयाला धन्यता वाटेल अशी ही कामगिरी!

या मोहिमेतून अनेक शोध लागणे अपेक्षित आहे. त्यातला एक म्हणजे चंद्रावरील अजस्त्र विवरांमध्ये मोठ्या प्रमाणावर बर्फ आढळला तर तो वितळवून पाणी उपलब्ध होईल. गंमत वाटली हे वाचून. पाण्याच्या शोधाची आस पृथ्वीच्या उपग्रहाच्या अंतरंगात घेऊन जातेय तर!

पाण्याच्या व्यवस्थापनावर देशभर अनेक ठिकाणी काम सुरू आहे. ३, ४ जून रोजी G20- C20LiFE या परिषदेत 'पाणी' या विषयावरच्या काही यशस्वी मोहिमांवरील सादरीकरण नीलेश कुलकर्णी या तज्ज्ञाने केले. त्यात त्यांनी देशभरातील ज्या कोणत्या सामाजिक संस्था पाणी प्रश्न सोडवण्यासाठी मोठे काम करत आहेत, त्यांची माहिती दिली. 'ग्रीन रामेश्वरम' या चेन्नईतील महत्त्वाकांक्षी प्रकल्पाबद्दल त्यांनी सांगितले, ज्यात मृत विहिरींचे पुनरुज्जीवन, वर्षा जल संचयन, शेततळी असे अनेक उपाय करून ते बेट सुजल केले जात आहे. आणखी एक उदाहरण त्यांनी दिले, ते 'हलमा' परंपरेचे. मध्य प्रदेशातील भिल्ल समाज एक परंपरा पूर्वापार पाळतो– 'गावातली कोणतीही समस्या सर्वांनी मिळून एकत्रितपणे सोडवायची.' त्या परंपरेला म्हणतात हलमा. मध्य प्रदेशातील झाबुआ आणि अलीराजपूर या दोन जिल्ह्यांनी ठरविले की आपली पाणी समस्या आपण सोडवूया. गावातील सर्वांनी मिळून श्रमदानाने शेकडो तळी बांधली. जमिनीत चर खणून पाणी जिरवले. समाजसेवक महेश शर्मा व आयआयटीयन हर्ष चौहान यांनी पुढाकार घेऊन 'शिवगंगा समग्र गाम विकास परिषद' ही संस्था स्थापन केली. २००५ पासून, वर्षातून एकदा या गावात दरवर्षी 'हलमा यात्रा' होते. त्यावेळी या गावचे मूळ रहिवासी जे आता देशभर फाकलेले आहेत, ते एकत्र येतात. श्रमदान करू इच्छिणारे इतर इच्छुकही येतात. सारे मिळून तळी, तलाव खणण्यासाठी काम करतात. गेल्या वर्षी ४० हजार जण या यात्रेत सहभागी झाले होते. फार नियोजनपूर्ण काम सुरू आहे हे! एका प्राचीन परंपरेचे हे अत्यंत विचारी, आधुनिक रूप.

समाजातील प्रश्नांवर उत्तरे काढण्यासाठी झटणारे असे अनेक सुधारक आपल्या देशात आहेत. अनेकदा त्यांचा पुरेसा प्रचार, प्रसारही होत नाही. G20 परिषदांच्या निमित्ताने भरताने ही संधी साधली. C20LiFEच्या व्यासपीठावर अनेकविध क्षेत्रातील समाजधुरीण एकत्र आले. त्यांच्यात विचारांची देवाणघेवाण झाली. परस्परांना ऊर्जा मिळाली. बौद्धिक, वैचारिक, सामाजिक योगदान देत समाजासाठी काम करणाऱ्या विविध संस्था, संघटनांच्या प्रतिनिधींना एकत्र भेटण्याची संधी मिळाली. अशा या व्यासपीठावरील एका राष्ट्रीय परिषदेत मुंबई ग्राहक पंचायतीचे काम पोहोचू शकले, ही आनंदाची व अभिमानाची बाब होती. आपल्या संस्थेची आत्मनिर्भरता, पर्यावरणस्नेही जीवनशैली जपणारे ग्राहक-संघटन, ग्राहक-हिताची असंख्य कामे अशी वैशिष्ट्ये तिथेही सर्वांना प्रभावित करणारी ठरली.

एक मात्र प्रकर्षाने जाणवले, 'संघटन में शक्ती है!' कोणतीही मोठी समस्या सोडवायची असो, किंवा सामाजिक बदल घडवायचा असो, लोकांनी एकत्र येऊन काम करण्याला पर्याय नाही. अनेक जण आता त्या जाणिवेने प्रयत्न करत आहेत. आपल्या संस्थेचे भाग्य हे की, आपण सुरुवातीपासून गेली ४८ वर्षे ग्राहकांना एकत्र आणण्याचे आणि वितरणाच्या माध्यमातून टिकवून ठेवण्याचे काम करत आहोत. बाजारातील अनिष्ट प्रथा, ग्राहकांना गृहीत धरणे, शासकीय धोरणे आखताना व निर्णय घेताना ग्राहकांचा विचार करणे– यासाठी ग्राहकांचा प्रभावी ठसा उमटवला पाहिजे. त्याकरिता आपले असलेले संघटन टिकविणे, वाढविणे आवश्यक आहे. या कामात प्रत्येक सभासद योगदान देऊ शकतोच. आपल्या कामाची माहिती परिचितांना देऊन सभासद वाढवणे, एव्हढे तरी तुम्ही करणार न?

**– शुभदा चौकर**

# जागतिक परिषदेत MGP चा प्रभाव!

**– ॲड. शिरीष वा. देशपांडे**

International Association of Consumer Laws (IACL) यांच्यातर्फे आयोजित द्वि-वार्षिक तीन दिवसांची जागतिक परिषद हॅम्बर्ग, जर्मनीत १९ ते २१ जुलै रोजी संपन्न झाली. या परिषदेचा विषय होता 'ग्राहक कायद्यांतील अनुत्तरित प्रश्न'. या परिषदेसाठी ॲड. शिरीष देशपांडे आणि ॲड. पूजा जोशी-देशपांडे यांनी सादर केलेला रिसर्च पेपर निवडला गेल्यामुळे त्याच्या सादरीकरणासाठी दोघांनाही तिथे निमंत्रित करण्यात आले होते. Global ODR - Smart Dispute Resolution in E commerce या रिसर्च पेपरवर परिषदेच्या पहिल्याच दिवशी दोघांनी संयुक्त सादरीकरण केले. उल्लेखनीय बाब म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर पहिल्यांदाच पदार्पण करणाऱ्या पूजा जोशी-देशपांडे हिने अत्यंत आत्मविश्वासाने तिचे सादरीकरण केले. किंबहुना आपण सादर केलेला विषय परिषदेच्या तीनही दिवसांत या ना त्या प्रकारे उपस्थित होत होता किंवा आपण उपस्थित करत होतो.

इ कॉमर्सद्वारे ग्राहकांना घर बसल्या किंवा कुठूनही हातातल्या मोबाईलद्वारे खरेदी करणे सहज शक्य झाले. काही मिनिटांतच वाणसामानाची वा सौंदर्य प्रसाधनांची, फॅशनेबल कपड्यांची वा पुस्तकांची ऑनलाईन खरेदी ग्राहकांच्या हातच्या स्मार्ट मोबाईलने सहज शक्य केली. अवघ्या काही तासांत सामान तुमच्या दारात. प्रवासाचा त्रास नाही, पार्किंगची डोकेदुखी नाही. वेळेची केवढी बचत आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे घरपोच डिलीव्हरीची सोय. त्यामुळे साहजिकच गेल्या पाच वर्षांत आणि विशेषतः कोव्हिडनंतर ऑनलाईन खरेदी ही ग्राहकांची जीवनशैली बनत गेली. सिनेमा तिकिटासाठी वा रेल्वे प्रवासासाठी रांगेत उभे राहण्याचे दिवस ऑनलाईन व्यवहारांनी इतिहास जमा करून टाकले. ऑनलाईन व्यवहारांत भारतासह संपूर्ण जगातच फार मोठ्या प्रमाणात वाढ झाली. परंतु ऑनलाईन खरेदी म्हणजे ग्राहकांसाठी निखळ वरदान निश्चितच नव्हते. कोणाकडून वस्तू विकत घेतोय तो विक्रेता डोळ्यासमोर नाही, जी वस्तू विकत घ्यायची ती निरखून, पारखून, हाताळून बघण्याची सोय नाही, बिल चुकतं करायचं तर समोर ते घेणारी व्यक्ती नाहीच. असा सर्व आंधळा किंवा अदृश्य कारभार. साहजिकच अशा परिस्थितीचा फायदा उठवणारी मंडळीसुद्धा या बाजारात असणारच. या ऑनलाईन खरेदीत फसवणूक झाल्याच्या तक्रारींचे प्रमाण गेल्या पाच वर्षांत चक्क चारपटीने वाढल्याचे सरकारी आकडेवारी सांगते. अशा तक्रारी सरकारची National Consumer Helpline सोडवण्याचा प्रयत्न करते. परंतु या तक्रारींचे निवारण त्या स्तरावर नाही झाले तर तक्रारदार ग्राहकाला ग्राहक न्यायालयात जाण्याचा सल्ला देण्यात येतो. म्हणजे किमान दोन-चार वर्षांची वाट बघणे आले. शिवाय ग्राहक न्यायालयात केस लढवण्याचा खर्च आणि मनःस्ताप वेगळाच. आता ऑनलाईन खरेदीच्या तक्रारींचे मूल्य असून असून किती असणार? दोन, पाच हजार, कधीतरी वीस, पंचवीस हजार तर क्वचित लाखभर. बँकांच्या ऑनलाईन व्यवहारांतील फसवणूक ही काहीवेळा लाखांतही





असू शकते. पण अशा या छोट्या-मोठ्या फसवणुकीच्या तक्रारींचे सुद्धा ऑनलाईन खरेदी इतक्याच शीघ्रतेने निवारण का होऊ नये? हा एक मोठ्ठा अनुत्तरित प्रश्न आपण गेली काही वर्षे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर मांडत असून त्यासाठी आपण सखोल अभ्यासानंतर योग्य ते उत्तर सुद्धा शोधले आहे. आणि ते उत्तर म्हणजे Global On-line Dispute Resolution.

ऑनलाईन खरेदीत अनेकदा खरेदीचा मंच एका देशाचा (उदा. ॲमेझॉन), त्यावरील वस्तूंचा विक्रेता दुसऱ्या देशाचा, त्या वस्तूचे उत्पादन तिसऱ्याच देशातील आणि ग्राहक चौथ्या देशातील. अशा वेळी ग्राहकाची फसवणूक झाली तर त्याच्या तक्रारींचे निवारण कोणत्या देशाच्या कायद्यानुसार होणार हा यक्ष प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे. आणि म्हणून याच विषयावर आम्ही आमचा संशोधन पेपर सादर केला होता. त्यासाठी देशोदेशीचे कायदे आणि प्रथा यांचा अभ्यास करून पेपर सादर केला. तो स्विकारला गेला आणि हॅम्बर्ग, जर्मनी येथे तो सादर करण्याची संधी मिळाली.

गेली काही वर्षे Global On-line Dispute Resolutionची संकल्पना आपण राष्ट्रीय आणि जागतिक स्तरावर मांडण्याचा प्रयत्न करतोय. याचे बीजारोपण आता जर्मनीच्या जागतिक व्यासपीठावर सुद्धा छान प्रकारे झाले आहे. त्याला उपस्थितांकडून प्रतिसादही उत्साहवर्धक आहे. अशा रीतीने ग्राहक कायद्यातील एका अनुत्तरित प्रश्नाचे उत्तर कशात दडले आहे हे दाखवण्याचा एक प्रयोग आपण जर्मनीत करून आलो आहोत. आशा आहे आपण बीजारोपण केलेल्या Global ODR ला येत्या एक-दोन वर्षांत पालवी फुटलेली आपल्याला पहायला मिळेल.

या परिषदेतील अन्य सादरीकरणेसुद्धा अभ्यासपूर्ण आणि उच्च दर्जाची होती. त्यामुळे एका अनुभव संपन्न परिषदेत सहभागी झाल्याचा आनंद मिळाला. तसेच या निमित्ताने संस्थेच्या आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या कामाचा इतर उपस्थितांना परिचयही करून देता आला.

♦

# ‘समेट’मुळे दिलासा

**आ**पल्या ‘समेट’ व्यासपीठावर आलेल्या आणखी एका तक्रारदार ग्राहकाला १४ ऑगस्टला दिलासा मिळाला. ही तक्रार होती ठाण्यातील एका विवाह संस्थेविरुद्ध. आपल्या मुलाचे लग्न जमवण्यासाठी तक्रारदार ग्राहकाने या संस्थेला २५ हजार रुपये भरले. पण काही दिवसांतच या संस्थेने ठाण्यातून गाशा गुंडाळला. अशा परिस्थितीत तक्रारदाराने ‘समेट’कडे तक्रार दाखल केली. त्यावर नोटीस पाठवण्यात आली. या विवाह संस्थेने ‘समेट’द्वारे मध्यस्थीने तक्रार निवारणासाठी नकार दिला. त्यावर पूजा जोशी-देशपांडे यांनी ग्राहकाला पुढील कारवाई करण्यासाठी मार्गदर्शन केले. ते कळताच या संस्थेने तक्रारदाराला बोलावून २१,६१० रुपये परत केले.

तक्रारदाराने संस्थेला रु. २,१०० देणगी म्हणून दिले आहेत. ♦

*(...पान क्र. ४ वरून)*

# पालघर पंचायत पेठ संपन्न

मुलांनी स्वतः गणपती बनविले. या कार्यशाळेत उमेश कवळे व हेमंत चामरे यांनी विनय पाटील यांच्या साथीने मार्गदर्शन केले.

पेठेत असलेल्या ५६ स्टॉलवर साड्या, ड्रेस मटेरियल, खेळणी, काचेचे दिवे, काथ्यापासून बनविलेल्या वस्तू, स्त्रियांची आभूषणे, लाकडी वस्तू, चादरी इ. दैनंदिन गरजेच्या वस्तूंची जोरदार खरेदी झाली. संघसंवर्धनाच्या दृष्टीने आपल्या वितरणातील दर्जेदार वस्तू संस्थेच्या स्टॉलवर विक्रीसाठी उपलब्ध होत्या. अशा तऱ्हेने पालघर येथील ग्राहक पंचायत पेठ उत्साहात संपन्न झाली.

पालघर विभाग व पालघर वितरण कार्यकारिणी या पेठेसाठी सातत्याने कार्यरत राहिली.

♦

# औषधांवर बारकोड - का, कशासाठी?

**– ममता आठल्ये**

**ड्रग कंट्रोलर जनरल ऑफ इंडिया(DCGI) ने औषध कंपन्यांसाठी नुकतेच एक परिपत्रक जारी केले आहे. त्यानुसार १ ऑगस्ट २०२३ पासून उत्पादित केल्या जाणाऱ्या औषधाच्या प्रत्येक बॅचवर, उत्पादन स्थळ भारतात कुठेही असेल तरी QR कोड किंवा बारकोड लावणे बंधनकारक करण्यात आले आहे.**

**भा**रतीय संविधान व न्यायव्यवस्थेने नागरिकांना आरोग्याचा मूलभूत अधिकार प्रदान केलेला आहे. या अधिकाराच्या पूर्ततेमध्ये आधुनिक औषधांचा मोलाचा वाटा आहे. आज भारत औषधनिर्मितीत जगात तिसऱ्या क्रमांकावर आहे तर एकूण उलाढालीत तेराव्या क्रमांकावर (२० बिलियन डॉलर्स) आहे. जेनेरिक औषधांच्या निर्मितीत सुद्धा आपण अव्वल आहोत. म्हणूनच आपल्याला 'फार्मसी ऑफ द डेव्हलपिंग वर्ल्ड 'असे संबोधले जाते. या प्रशंसनीय कामगिरीला लागलेले गालबोट म्हणजे नकली/बनावट औषधांची निर्मिती व निर्यात यात सुद्धा आपण रशिया, चायना, ब्राझील, पाकिस्तान या देशांबरोबर आघाडीवर आहोत.




जागतिक आरोग्य संघटनेच्या सर्वेक्षणानुसार जगभरात वितरित केल्या जाणाऱ्या औषधांमधील १२ते २५%उत्पादने ही नकली, हलक्या दर्जाची किंवा दूषित असतात. अमेरिका, युरोप सारखे प्रगत देशही या समस्येतून सुटलेले नाहीत. त्यांच्या वितरण व्यवस्थेतील १% औषधे ही नकली असतात. आफ्रिकन देशांमध्ये मलेरिया व क्षय रोगावरील बनावट औषधांमुळे ०.७० मिलिअन लोकं दगावतात. जगासाठी नकली औषधांची समस्या नवीन नाही. विशेषतः कोरोना महामारीपासून ही समस्या भीषण होत चालली आहे. कोरोनामध्ये औषधांची जागतिक वितरण व्यवस्था बंद पडली. क्रॉसबॉर्डर व्यवहार ठप्प झाले. आपल्या नागरिकांना जीवसंरक्षक औषधे उपलब्ध करून देण्यासाठी प्रत्येक देशाला झगडावे लागले. या परिस्थितीचा फायदा घेत ऑनलाईन फार्मसीचे पेव फुटले. घरबसल्या मागणीची सुलभता, औषधांची सहज उपलब्धता आणि घरपोच डिलिव्हरी यामुळे जनमानसाने याचा त्वरित अंगीकार केला. त्यामुळे नकली व बनावट औषधांची अनिर्बंध विक्री झाली. २०२०-२०२१मध्ये ऑनलाईन फार्मसीच्या विक्रीत ४७% वाढ झाली. WHO नुसार ऑनलाईन विक्री केली जाणारी ५०% औषधे ही बनावट असतात. दरवर्षी जगातील १मिलियन मृत्यू हे नकली औषधांमुळे होतात.

WHOच्या इंटरनॅशनल मेडिकल प्रॉडक्ट्स अँटिकाउंटरफिटिंग टास्कफोर्स (IMPACT)ने केलेली नकली औषधांची व्याख्या-फसवे लेबलिंग किंवा मार्केट मधील प्रसिद्ध उत्पादनाची नक्कल करून औषधाची खरी ओळख व स्रोत लपविणे अशी आहे. आपल्या औषधे आणि सौन्दर्यप्रसाधने कायद्यानुसार त्यांचे तीन प्रकारात वर्गीकरण केले आहे-

१) भेसळयुक्त उत्पादने- यात उपयुक्त घटकाची मात्रा कमीजास्त प्रमाणात असते किंवा अजिबात नसते. घातक किंवा विषारी पदार्थांचा वापर. मुदतबाह्य औषधांचे पुनः लेबलिंग करणे.

२) हलक्या दर्जाची उत्पादने- यातील घटकपदार्थ दुय्यम दर्जाचे असतात.

३) कमी प्रमाणात दोष असलेली उत्पादने- उदा. उत्पादनाचा रंग बदलणे, लेबलमध्ये चुका, पारदर्शी द्रवपदार्थात गाळ जमा होणे

अशा बनावट औषधांमुळे जागतिक आरोग्य व्यवस्थेवर ताण येतो आहे. उपचार पद्धतीतील अपयशामुळे रोगराई, मृत्यू, प्रतिजैविकांना वाढता प्रतिरोध यामुळे नागरिकांचा आरोग्य व्यवस्थेवरील विश्वास ढासळत चालला आहे.

## धोरण हवे – जेनेरिक औषधे

राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने, डॉक्टरांनी प्रिस्क्रिप्शनवर जेनेरीक औषधे लिहिण्याची सक्ती केली असून तिचे उल्लंघन करणाऱ्याचा परवाना स्थगित अथवा रद्द केला जाईल असा इशारा दिला आहे. इंडियन मेडिकल असोसिएशनने याबाबतची सक्ती तातडीने न करता कालबध्द पध्दतीने करण्याची मागणी केली आहे. त्यांनी जेनेरिक औषधांच्या दर्जाबाबत शंका व्यक्त केली असून ती दर्जेदार असावीत आणि ब्रॅण्डेड औषधांच्या किमतीही नियंत्रणात असायला हव्यात असे सांगून जेनेरिक औषधे लिहून देण्यास त्यांचा विरोध नाही, असेही स्पष्ट केले आहे. मात्र अशी सक्ती करण्यास आणि डॉक्टरांवर कारवाई करण्यास विरोध व्यक्त केला आहे. याबाबत सध्या प्रसारमाध्यमांत अनेक तज्ज्ञ मतमतांतरे व्यक्त करत आहेत. जेनेरिक औषधांची सक्ती करण्यासंदर्भात नियोजनबध्द कार्यपद्धती आखणे जरूरीचे आहे, असा सार्वत्रिक विचार व्यक्त होत आहे.

ड्रग माफियांना नशिले पदार्थ विकण्यापेक्षा महाग आणि मोठ्या प्रमाणात विकल्या जाणाऱ्या औषधांची नक्कल करून बाजारात विकणे अधिक किफायतशीर झाले आहे. आरोग्य सेवेवरील वाढता खर्च, दारिद्र्य व अज्ञान, गुणवत्तेविषयी अनभिज्ञता, अनधिकृत औषधांसाठी अपुरा दंड, कायद्याच्या अंमलबजावणीतील त्रुटी यामुळे बनावट औषध निर्मितीला आळा बसत नाही.

आज भारताच्या निर्यातीत औषध उत्पादनांचा ८% हिस्सा आहे. पण नकली औषधांमुळे देशाची बदनामी होत आहे. या पार्श्वभूमीवर आपल्या केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने ठोस पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.

## औषधांची नावे आता प्रादेशिक लिपीतही

विरार येथील आपले ज्येष्ठ कार्यकर्ते आणि ख्यातनाम बालरोगतज्ज्ञ डॉ. हेमंत जोशी यांनी सरकार आणि औषधी कंपन्या यांच्याकडे औषधांवर मराठीतूनही नाव असण्याचा आग्रह धरला होता. यासंबंधी निश्चित नियम नसला तरी आता अनेक औषधी कंपन्यांनी इंग्रजी आणि देवनागरी बरोबरच प्रादेशिक भाषेत औषधांची नावे देण्यास सुरुवात केली आहे. ज्यावेळी डॉक्टर औषध लिहून देतील त्यावेळी त्यांनी मराठीत सुद्धा ते नाव लिहून द्यावे अशी विनंती आपण करावी. त्यामुळे दुकानातून योग्य तेच औषध मिळाले आहे, हे लगेच कळू शकेल.

ड्रग कंट्रोलर जनरल ऑफ इंडिया(DCGI)ने औषध कंपन्यांसाठी नुकतेच एक परिपत्रक जारी केले आहे. त्यानुसार १ ऑगस्ट २०२३ पासून उत्पादित केल्या जाणाऱ्या औषधाच्या प्रत्येक बॅचवर, उत्पादन स्थळ भारतात कुठेही असेल तरी QR कोड किंवा बारकोड लावणे बंधनकारक करण्यात आले आहे. पहिल्या टप्प्यात सर्वाधिक विकल्या जाणाऱ्या ३०० औषधांचा समावेश करण्यात आला आहे. ज्यांची रिटेल विक्री ५०,००० कोटी रुपये आहे. यात प्रतिजैविके, हृदयरोग, वेदनाशामक, मधुमेह, रक्तदाब, ॲलर्जी यावरील औषधांचा समावेश आहे. बनावट औषधांची निर्मिती ते विक्री यावर आळा घालण्यासाठी सरकारच्या ट्रॅक अँड ट्रेस यंत्रणेअंतर्गत या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. या कोड च्या स्कॅनद्वारे पुढील माहिती ग्राहकाला मिळू शकते.

१. युनिक प्रॉडक्ट आयडेंटिफिकेशन कोड
२. प्रॉपर व जेनेरिक नाव
३. ब्रॅंड नेम
४. उत्पादकाची माहिती
५. बॅच नंबर
६. उत्पादन तारीख व अंतिम मुदत
७. उत्पादन परवाना क्रमांक


DCGI ने म्हटल्यानुसार हा बारकोड प्राथमिक पॅकिंग वर प्रिन्ट करावा किंवा चिकटवावा. जागा नसल्यास कार्टन वर लावावा. आयात केलेल्या औषधांसाठी सुद्धा हा नियम लागू होईल. फक्त त्यांना देशातील परवाना प्राधिकरणाकडून परवानगी घ्यावी लागेल. सामान्य नागरिकाला कोड स्कॅन केल्यावर विशिष्ट औषधाचे संकेतस्थळ, शास्त्रीय माहिती, दुष्परिणाम यासंबंधी अचूक माहिती मिळेल. औषधाच्या गुणवत्तेविषयी शंका निर्माण झाल्यास उत्पादन मार्केटमधून परत मागविण्याची प्रक्रिया सोपी होईल. उत्पादकापासून ते ग्राहकापर्यंतच्या वितरण साखळीतील सर्व घटकांवर नियंत्रण आल्यामुळे चोरी, भेसळ यास प्रतिबंध होईल.

औषधे आणि सौंदर्यप्रसाधने कायदा १९४० मध्ये २००८च्या सुधारणांनुसार नकली औषधांना पायबंद घालण्यासाठी, कारावास अशा शिक्षा आहेत.

*(पान क्र. १० पाहा...)*

## भावपूर्ण श्रद्धांजली

**विनायकराव लेले**



मुंबई ग्राहक पंचायतीचे एक ज्येष्ठ माजी पदाधिकारी विनायकराव लेले यांचे २६ जुलै रोजी ठाणे येथे त्यांच्या निवासस्थानी निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ९९ वर्षे होते.

त्यांच्या निधनाने मुंबई ग्राहक पंचायतीच्या परिवारातील एक आदर्शवादी, स्वच्छ आचार-विचारांची व्यक्ती हरपली.

मुंबई ग्राहक पंचायत आणि पूर्वीच्या जनता मध्यवर्ती ग्राहक संस्थेच्या जडणघडणीत विनायकरावांचा मोलाचा वाटा होता. १९७८ पासून सभासद. १९८३ पासून ते संस्थेचे काम करू लागले. १२ वर्षे ते आपल्या संस्थेचे सेक्रेटरी म्हणून काम बघत होते. चोख व्यवहार, शिस्तबद्ध कारभार ही त्यांची खासियत होती. संस्थेच्या आर्थिक व्यवहारांवर विनायकरावांचे अखेरपर्यंत बारकाईने लक्ष होते. ठाणे वितरण केंद्राला त्यांचे अखेरपर्यंत मार्गदर्शन लाभले.

विशेषतः वार्षिक अहवाल प्रसिद्ध झाला की संस्थेची व पंचायत पेठांची उलाढाल, त्यातून राहिलेले आधिक्य, त्याचा विनियोग ह्याची विचारपूस ते करायचे. आपल्या घरातील वडीलधारी व्यक्ती जशी सर्वांची आपुलकीने चौकशी करेल, तीच आत्मीयता त्यांना कार्यकर्त्यांबद्दल वाटायची. ठाणे येथे राहत असल्याने ठाणे विभागातील कार्यकर्त्यांशी ते या वयातही संपर्कात होते. अत्यंत बारकाईने संस्थेच्या कारभारावर लक्ष ठेवणाऱ्या विनायकराव लेले यांना विनम्र आदरांजली.

# इ कॉमर्स - तक्रार अशी सुटली

– **ऋचा गोडबोले**, *उदय ग्राहक संघ, गोरेगाव*

**मा**र्च २०२३ मध्ये मी एक चामड्याची पिशवी ऑनलाईन मागवली. जून २०२३ पर्यंत ना मला पिशवी मिळाली, ना पैसे परत मिळाले. सर्व पाठपुरावा लिखित आणि अनुत्तरित राहिलेला होता.

जुलै २०२३ मध्ये एकदा त्यांनी मला कळवलं की तुमची ऑर्डर तुमच्याकडे धाडली आहे, तरीही पिशवी काही आली नाही.

मी माझी पिशवी मिळायची आशा सोडून दिली होती, योगायोगाने ह्याच दरम्यान माझी शुभदा चौकर यांच्याशी ह्या विषयावर चर्चा झाली आणि त्यांनी माझा संपर्क शर्मिला रानडे यांच्याशी घडवून आणला. शर्मिलाताईंनी मला https://consumerhelpline.gov.in वर तक्रार कशी करायची ते सांगितलं. अशा स्वरूपाची तक्रार मी करते आहे अशी एक निर्णायक ई-मेल मी त्या कंपनीलाही पाठवली. या प्रयत्नानंतर ऑगस्टमध्ये माझी पिशवी लगेच माझ्या घरी पोचती झाली! मुंबई ग्राहक पंचायतीला धन्यवाद! ♦

*(...पान क्र. ९ वरून)*

## औषधांवर बारकोड...

ग्राहकांनी सुद्धा बनावट औषधांपासून सावधान राहण्यासाठी पुढील गोष्टी कटाक्षाने पाळल्या पाहिजेत-

१. विश्वासार्ह औषध विक्रेत्याकडूनच औषधे खरेदी करावीत. प्रिस्क्रिपशनवर मिळणारी औषधे 'ओव्हर द काउंटर' विकत घेऊ नयेत.

२. सवलतींच्या प्रलोभनांना भुलून ऑनलाईन फार्मसी मधून औषधे विकत घेणे टाळावे. ऑनलाईन फार्मसीला CDSCOकडे नोंदणी करणे बंधनकारक असले तरी सुद्धा त्यांच्यासाठी अजून वेगळे कायदे करण्यात आलेले नाहीत. संकेतस्थळ सुद्धा फसवे असू शकते. DCGI ने फेब्रुवारी २०२३मध्ये अनेक ई फार्मसींना वैध परवान्याशिवाय शेड्युल ड्रग्स विकल्याबद्दल शो कॉझ नोटीस बजाविल्या होत्या.

३. प्रवासाला जाताना आपल्याला लागणारी सर्व औषधे बरोबर न्यावीत.

बनावट औषधांची समस्या ही जागतिक पातळीवर असल्यामुळे सर्व देशांनी एकत्र येऊन नियंत्रण यंत्रणा उभी करणे उचित ठरेल. ♦

# ‘भरड धान्ये - शाकाहारी आहारातील ऊर्जा केंद्र’

**– मंगला गाडगीळ**

‘**भ**रड धान्य वर्ष’ विषयी अधिक माहिती देण्यासाठी तीन भागांच्या वेबिनार मालिकेला २० जुलैला सुरुवात झाली. डॉ. स्मिता लेले यांच्या शिष्या डॉ. शालिनी आर्य या पहिल्या कार्यक्रमात काही अपरिहार्य कारणापायी येऊ शकल्या नाहीत. त्यांच्याऐवजी डॉ. स्मिता लेले यांनी माहिती दिली.




या कार्यक्रमात त्यांनी निरनिराळ्या भरड धान्यांची नावे, त्यांची उपयुक्तता आणि कोणत्या प्रदेशात ते वापरले जाते, याची माहिती दिली.

या मालिकेतील दुसरा भाग ३ ऑगस्ट २०२३ रोजी पार पडला. या भागाचा विषय ‘भरड धान्ये – शाकाहारी आहारातील ऊर्जा केंद्र’ असा होता. भरड धान्ये जगासाठी नवीन असली तरी आशिया आणि आफ्रिका खंडात वर्षानुवर्षे खाल्ली जात आहेत. कमी पाण्यात कमी कसदार जमिनीत तयार होणारी म्हणून भरड धान्य हे गरिबांचे अन्न समजले जाई. त्यावर संशोधन झाल्यावर मात्र हा गैरसमज दूर झाला. भरड धान्ये ही बीजेच असतात. त्यामुळे रोप वाढण्यासाठी उपयुक्त असे सर्व काही त्यात असते. ही आकाराने लहान असल्याने त्यात स्निग्धांश व प्रोटीनचे प्रमाण कमी आणि पिष्टमय पदार्थांचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे ही पचण्यासाठी हलकी असतात. ग्लायसेमिक इंडेक्स आणि नवीनच प्रचारात आलेली ग्लायसेमिक लोड या संकल्पनाही समजावून सांगितल्या. या धान्यावरील कवच हे माणूस पचवू शकत नाही. काहीवेळा त्यात काही विषारी तत्त्वेही असू शकतात. म्हणूनच ही धान्ये भाजून, आंबवून, शिजवून खाण्याचा सल्ला त्यांनी दिला.

दोन्ही कार्यक्रमांचे स्वागत आणि प्रास्ताविक मंगला गाडगीळ यांनी केले. पाहुण्यांची ओळख अंजली पोतदार यांनी करून दिली. प्रेक्षकांनी भरभरून त्यांचे प्रश्न आणि शंका विचारल्या. त्यांना स्मितातार्इंनी तितक्याच उत्साहाने उत्तरे दिली. हे सत्र रंजना मंत्री यांनी समर्पक रीतीने हाताळले. शेवटी सर्वांचे आभार मानले. दोन्ही कार्यक्रमासाठी राजेंद्र राणे यांनी पोस्टर्स बनविली होती. ♦

---

# आनंददायी वर्षासहल!

**– मधुसूदन विद्याधर जोशी**, *पालघर विभाग*

२२ जुलै २०२३ रोजी पालघर विभागाची सहल ND स्टुडिओ, चौक, कर्जत येथे आजोयित करण्यात आली होती. १५१ जणांनी सहलीचा आनंद लुटला.

६० एकरच्या प्रशस्त जागेत नितीन चंद्रकांत देसाई या प्रख्यात कलादिग्दर्शकाने हा स्टुडिओ उभारला. लाल किल्ला, शनिवार वाडा, दिवाणे आम, दिवाणे खास, कितीतरी सेट्स



प्रेक्षणीय आहेत आणि आरसे महाल तर नेत्रदीपक आहे. स्टुडिओ टूर झाल्यावर मग दस्तुरखुद्द नितीन देसाई ह्यांची भेट झाली. देसाई यांनी त्यांचा कला जगताचा प्रवास, स्टुडिओ उभारण्यामागची संकल्पना आणि दृष्टिकोन त्यांनी सांगितला. या ठिकाणी चित्रित केलेल्या विविध चित्रपट, मालिकांचे प्रसंग त्यांनी सांगितले. त्यानंतर काही दिवसांनी नितीन देसाई यांचा दुर्दैवी अंत झाला. ही भेट सभासदांच्या मनात कायम घर करून राहणार यात शंका नाही.

संध्याकाळी परतीच्या प्रवासात वाटेत नढाळ गावात ‘पंचायतन’ देवस्थान आहे, तिथे भेट दिली. जे. एम. म्हात्रे यांनी हे संकुल उभारले आहे जिथे शाळा, मंदिरे, हॉल अतिशय सुबकपणे निर्माण केली आहेत. या ठिकाणी काळाचा आघात नुकताच सोसलेल्या इर्शाळ वाडीतील बेघर झालेल्या गावकऱ्यांच्या राहण्याची, जेवणाची सोय या ट्रस्टचे प्रीतम म्हात्रे यांनी सामाजिक बांधिलकीच्या भावनेने केली. ♦

# मुंबई ग्राहक पंचायत पेठ दालन तक्ता - (दादर)

३० सप्टेंबर ते ०८ ऑक्टोबर २०२३

सूर्यवंशी क्षत्रिय हॉल, स्वातंत्र्यवीर सावरकर मार्ग, दादर (प.)

वेळ – दुपारी १२ ते रात्रौ ८.३०

शनिवार – रविवार व सुट्टीच्या दिवशी, सकाळी ११ ते रात्रौ ८.३०

| क्र. | स्टॉलचे नाव | वैशिष्ट्ये |
|---|---|---|
| १. | स्वामिनी कलेक्शन | इरकल, पेशवाई सिल्क, इचलकरंजी कॉटन साड्या |
| २. | युनिक कलेक्शन | विविध प्रकारच्या साड्या व पैठणी |
| ३. | राजू एम्ब्रॉयडरी वर्क्स | आसाम, टसर सिल्क सारीज व ड्रेस मटेरिअल |
| ४. | अथर्व कलेक्शन | जामदानी, कोरा, इश्री, बनारसी, कोसा सिल्क साड्या |
| ५. | श्री सिल्क | कांचीपुरम, कांजीवरम वेडींग सिल्क, अजरख, मोडाल सारीज |
| ६. | वित्ताशी एंटरप्रायझेस | हॅण्ड ब्लॉक, अजरख प्रिंट साड्या, ड्रेस मटेरिअल आणि स्टोल्स |
| ७. | शांभवी सिल्क सारीज | विविध प्रकारच्या सिल्क/कॉटन सारीज, दुपट्टे व स्टोल्स |
| ८. | लोपामुद्रा सारीज | लोपामुद्रा साडी (हातमाग), ड्रेस मटेरिअल्स, तयार ब्लाऊज |
| ९. | सिमरन कलेक्शन | विविध प्रकारच्या डिझाईनर कुर्तीज, प्लाझो सेट |
| १०. | मोहक क्रिएशन्स | फॅन्सी कुर्तीज, कलमकारी, इक्कत रेडिमेड कुर्ते |
| ११. | स्पर्श क्रिएशन्स | लखनवी कुर्ती, पटियाला, प्लाझो, दुपट्टे इ. |
| १२. | वल्लरी फॅशन | डेनिम कपडे– स्त्रिया, पुरुष व मुलांसाठी |
| १३. | कायरा कलेक्शन | लेगिंग, जॅकेटस, सिल्क कुर्तीज, ड्रेस मटेरिअल |
| १४. | एम अ‍ॅण्ड एम्स एक्सक्लुझिव्ह | शॅडो वर्क, हॅंड एम्ब्रायडरी कुर्ती, टॉपस्, साड्या |
| १५. | दुर्वांजल क्रिएशन्स | शॉर्ट/लाँग सिंगल कुर्तीज, पॅण्ट, टॉप सेटस् |
| १६. | नारी बुटिक | शॉर्ट अ‍ॅण्ड लाँग कुर्ती (बाघरू व दाबू प्रिंटस) |
| १७. | राधा फॅशन्स | बाटिक, इक्कत्, बांधणी, चंदेरी ड्रेस मटेरिअल |
| १८. | अनुराधाज् कलेक्शन | महेश्वरी, कलमकारी, प्युअर सिल्क ड्रेस मटेरिअल |
| १९. | रमा कलेक्शन | ड्रेस मटेरिअल – कलमकारी, मंगलगिरी, संबळपुरी इक्कत कॉटन |
| २०. | स्वस्तिक होजिअरी | लेडीज अंडरगार्मेंटस् |
| २१. | लुक अ‍ॅट मी | सर्व वयोगटासाठी नाईट सूट |
| २२. | मायलेकी | बाटिक, जयपूर गाऊन्स |
| २३. | सोहानी क्रिएशन | बाटिक, अल्पाईन, रॅप गाऊन, कॉटन गाऊन |
| २४. | पिपा क्रिएशन | कॉटन वन पिस शॉर्ट, कॉटन स्कर्ट, फॅन्सी ब्लाऊज |
| २५. | निओ गार्मेंटस् | लहान–मोठ्यांचे टी शर्टस्, होजिअरी ट्रॅक सूट |
| २६. | डी.टी.निटवेअर | बनियन्स, ट्रॅकसूट, टी शर्टस्, सॉक्स इ. |
| २७. | भारतीय खादी सेंटर | लेंगे, झब्बे, शर्टस्, पंचे, हातरुमाल, जॅकेटस् |

| क्र. | स्टॉलचे नाव | वैशिष्ट्ये |
|---|---|---|
| २८. | ब्लिस टी शर्टस् | ग्राफीक टी शर्टस् |
| २९. | अतरंगी मराठी टीशर्ट | मराठी कॅलिग्राफी टीशर्टस् |
| ३०. | जयपूर हँडलूम | बेडशिट, ड्रेस मटेरिअल, रजया इ. |
| ३१. | अहिल्या महिला मंडळ | गरजू महिलांनी केलेल्या मलमलच्या गोधड्या |
| ३२. | महाटेक्स | टॉवेल, सतरंज्या, दोहर, ५ वारी ६ वारी साड्या |
| ३३. | पल्लवी कव्हर्स | सोफा, फ्रीज हँडल, टॉप, मिक्सर, साडी इत्यादींचे कव्हर्स |
| ३४. | ब्लॉक्स अॅण्ड बाटिक्स् | ब्लॉक प्रिंटस/बाटिकचे बेडशीट्स, कुशन/पिलो कव्हर्स, टेबल मॅटस् सेट |
| ३५. | ऊब | हस्तकलेच्या गोधड्या, बेडींग, पायपुसणे |
| ३६. | मल्हार क्रिएशन्स | बाळाचे कपडे, दुपटी, टोपी, लहान मुलांचे कपडे |
| ३७. | विकास लेदर वर्क्स | लेदर पर्सेस, पाऊच, लेदर जॅकेट इ. |
| ३८. | एस अॅण्ड एस बॅग्ज् | फॅन्सी बॅग्ज, पर्सेस आणि बेबी बॅग्ज |
| ३९. | उद्यमिता | महिला बचत गटांनी बनवलेल्या पर्सेस, फोल्डर्स |
| ४०. | शिवम बॅग्ज | आकर्षक रंगसंगतीच्या पर्सेस, डेनीम बॅग्ज, सॅक इ. |
| ४१. | अर्थिता बॅग्ज अॅण्ड पाऊचेस | विविध प्रकारच्या ऑर्गनायझर्स बॅग्ज |
| ४२. | पॅकेम् टोट बॅग्ज अॅण्ड वॉलेट | वॉलेट्स, टोट बॅग्ज, इतर टोट बॅग्ज |
| ४३. | स्वप्नालंकार | इमिटेशन व सी झेड ज्वेलरी, गणपती-गौरीसाठी मोत्याचे दागिने |
| ४४. | ट्रॅडिशनल ऑर्नामेंटस् | इमिटेशन ज्वेलरी, आर्टिफिशल ज्वेलरी |
| ४५. | आर्ट इन संस्कृती | सेमी प्रेशिअस स्टोन, ग्लास बीड्स ज्वेलरी |
| ४६. | श्री महालक्ष्मी आर्टस् | पारंपरिक व अॅण्टीक ज्वेलरी |
| ४७. | फॅशन क्युरा ज्वेलरी | टेरा-कोटा ज्वेलरी |
| ४८. | युथोपिया | गायीच्या तुपाच्या लिपस्टीक, फाऊंडेशन क्रिम |
| ४९. | स्पायका होम प्रॉडक्टस् | घरगुती साफसफाईची उत्पादने |
| ५०. | मिथ परफ्यूम व अगरबत्ती | विविध प्रकारची अत्तरे, सुगंधी अगरबत्ती |
| ५१. | गुजरात हँडिक्राफ्ट | बारीक मोत्यांच्या शोभिवंत वस्तू, तोरणे इ. |
| ५२. | अखंडज्योत | टाळ, घंटी, झांज इ. |
| ५३. | ज्ञासा ग्लास आर्टिफॅक्टस् | काचेचे दिवे, पूजा सेटस्, अत्तरदाणी इ. |
| ५४. | हरि ओम वुड वर्क्स | लाकडाच्या विविध कलात्मक वस्तू |
| ५५. | प्रथम डेकॉर | वेगवेगळे कॅण्डल स्टॅन्डस् |
| ५६. | देसाई आर्टस् | मातीच्या पेंटिंग केलेल्या शोभेच्या वस्तू |
| ५७. | सयाना आर्टस् अॅण्ड गिफ्टस् | तोरण (मोती, मेटल), मोत्याचे हार, रेडिमेड रांगोळ्या व इतर गिफ्टस् |
| ५८. | शिल्पनिल कलेक्शन | तांबा, पितळ मूर्ती, भांडी, पूजा साहित्य आणि विविध शोभेच्या वस्तू |
| ५९. | नेचर्स वूड | सावंतवाडी स्पेशल लाकडी खेळणी |
| ६०. | शीलाताई फूड प्रॉडक्टस् | लोणचे, सरबत इ. |
| ६१. | कर्णिक कृषी उद्योग | गुलकंद, शेजवान सॉस |

| क्र. | स्टॉलचे नाव | वैशिष्ट्ये |
|---|---|---|
| ६२. | मे. वेस्टर्न घाट ॲग्रो इंडस्ट्रिज | सर्व प्रकारचे मध |
| ६३. | महावीर ट्रेडर्स | क्रोकरी, बनियन, मोजे इ. |
| ६४. | श्री विनायक एंटरप्रायझेस | घरगुती सफाईचे विविध ब्रश व रांगोळ्या |
| ६५. | वंश गार्डन इनोव्हेटीव्हज् | फोल्डींग चटया, फोल्डींग वेताचे पडदे |
| ६६. | महालक्ष्मी एंटरप्रायझेस | किचन वेअर्स |
| ६७. | विनय एंटरप्रायझेस | किचनमधील विविध आकर्षक स्टॅण्डस् होल्डर इ. |
| ६८. | ओमकार मार्केटींग | हार्ड ॲनोडाइज्ड किचन वेअर्स |
| ६९. | एस.के. एंटरप्रायझेस | फोल्डिंग टेबल्स |
| ७०. | गेबी क्लिनिंग | साफ सफाईची उत्पादने |
| ७१. | स्टेप इन वॉक शूज | विविध डीझाईन्सच्या चप्पलस्, सॅडल्स, शूज इ. |
| ७२. | आनंदवन | कुष्ठरोग्यांनी बनविलेली विविध उत्पादने |

# चेंबूर विभागाची सहल

**– तन्वी घैसास**, चेंबूर

मुंबई ग्राहक पंचायत शाश्वत जीवन शैलीची पुरस्कर्ती, २०२३ हे भरड धान्य वर्ष, ९ ऑगस्ट हा आदिवासीदिन असा त्रिवेणी संगम साधत चेंबूर विभागाची सहल बदलापूर येथील राजेंद्र भट यांच्या 'निसर्गमित्र फार्म' वर आयोजित केली होती. चेंबूर विभाग कार्यकारिणी सदस्य आणि सभासद असे एकंदर २५ जण या सहलीत सहभागी झाले होते.




निसर्गमित्र फार्म ही संस्था गेली ३०-३२ वर्ष सेंद्रिय पद्धतीने शेती करते.

सकाळी 'निसर्गमित्रफार्म'ला नाश्ता झाल्यानंतर भट काकांच्या शिवारात फिरायला निघालो. हिरव्या रंगाच्या विविध छटांनी रान नुसतं तरारून गेलं होतं. दुपारी चविष्ट स्वयंपाकाचा आस्वाद घेताना जमिनीतून, नैसर्गिक खतातून धान्य, भाजीपाला यांना मिळणारी चव काय असते ते जाणवलं.

आदिवासी आणि निसर्ग यांचं अनोखं नातं. आदिवासींचं निसर्गाबद्दलचे प्रेम, निसर्गातील त्यांची निरीक्षणं आणि त्याबद्दल त्यांना असलेली माहिती पाहून आम्ही थक्क झालो. त्यांचं औषधी वनस्पतींचे ज्ञानही अफाट होते.


निसर्गाला पूरक अशाच भेटवस्तू देऊन आम्ही त्या आदिवासींचा सन्मान केला, त्यांचे ऋण मानले.

निसर्गाच्या सानिध्यात दिवस घालवून सर्वजण ताजेतवाने झाले.

♦

## भावपूर्ण श्रद्धांजली

**पद्माकर वि. जोशी**



मुलुंडच्या पाम एकर्स संघाचे संघप्रमुख पद्माकर वि. जोशी यांचे १ ऑगस्ट २०२३ रोजी वृध्दापकाळाने वयाच्या ९० वर्षी निधन झाले ते गेली ४० वर्ष संघप्रमुख होते. ते मनमिळावू, सर्वांना मदत करणारे आणि आनंदी स्वभावाचे होते. त्यांनी देहदान केले आहे.

वाचू आनंदे

## दिवाळीचा बौद्धिक फराळ : नोव्हेंबर २०२३

*• **वयम्** : छापील किंमत २६० रु., वाटपातील किंमत २३१ रु.; • **ऋतुरंग** : छापील किंमत ३०० रु., वाटपातील किंमत २१८ रु.; • **स्वरप्रतिभा** : छापील किंमत २६० रु., वाटपातील किंमत १९०रु.; • **अक्षरधन** : छापील किंमत २१०रु., वाटपातील किंमत १८०रु*

**या वर्षी दिवाळी नोव्हेंबर महिन्याच्या १० तारखेपासून सुरू होते आहे. दिवाळी अंकांची मागणी ऑक्टोबर महिन्यात करावयाची आहे, जेणेकरून नोव्हेंबरमध्ये अंक वितरीत करता येतील.**

पुस्तक निवड समितीने आपल्या सदस्य कुटुंबियांच्या वाचनाची भूक भागविणारे, आठवणीत रमविणारे आणि मनाची मशागत करणारे साहित्य देणारे पुढील दिवाळी अंक देण्याचे निश्चित केले आहे.

### वयम् – आपण सारे

कुटुंबातील बालक आणि पालक या दोघांसाठी अतिशय उपयुक्त माहिती आणि वाचनीय कथांनी सजलेला ‘वयम्’ दिवाळी अंक गेल्या दहा वर्षांत अनेक बक्षिसांचा मानकरी ठरला आहे. केवळ प्रथितयश नव्हे तर मुलांची नस ओळखून विविध विषय त्यांच्यासाठी मांडणाऱ्या लेखक, कवी, चित्रकार यांच्या उपस्थितीने हा दर्जेदार अंक देखणाही होणार आहे.

डॉ. बाळ फोंडके, राजीव तांबे, डॉ. मानसी राजाध्यक्ष, श्रीकांत बोजेवार, प्रवीण दवणे, गणेश मतकरी, डॉ. प्रसन्न दाभोलकर आणि इतर अनेक सिध्दहस्त लेखकांच्या कथा तर आहेतच. मात्र त्याबरोबर डॉ. उज्वला दळवी (इम्युनिटी प्रकरण आहे तरी काय?), डॉ. आनंद नाडकर्णी (एका जहाजाची १८० वर्षांची कहाणी), इस्रोला भेट देऊन आलेल्या लातूरच्या मुलांचा अनुभव लेख, असे वाचकांच्या माहितीत मोलाची भर – त्यांना समजेल अशा भाषेतून–घालणारे अनेक लेख वेगळा वाचनानंद देतील. अर्थात सोबतीला भरपूर चित्रे आणि कोडी पण असणार आहेत. दिवाळीची रंगत या रंगी–बेरंगी अंकाने वाढेल, हे नक्की. मुलांबरोबर पालकांनी व आजी–आजोबांनीही जरूर वाचावा, असा हा अंक आहे.

### ऋतुरंग

यंदा एकतिसाव्या वर्षात पदार्पण करणाऱ्या आणि विविध पुरस्कार मिळवणाऱ्या या दिवाळी अंकाचे स्वरूप वैशिष्ट्यपूर्ण आहे. प्रथितयश व्यक्तींना त्यांच्या जीवनात काही खास व्यक्ती भेटतात. त्या लक्षात राहतात, त्यांचा ठसा उमटवितात. अशा चांगल्या व्यक्ती समाजातील चांगुलपणा, मूल्यानिष्ठा यांच्या जणू प्रतिनिधी असतात. वैयक्तिक आणि सामाजिक जीवनाला एक बैठक देण्याचे काम त्यांच्या कडून होत असते.

विविध पातळ्यांवर समाजात आणि समाजासाठी कार्यरत असणाऱ्या नामवंत व्यक्तींच्या आयुष्यात आलेल्या अशा अनेक व्यक्ती या अंकातून वाचकांना भेटतील. डॉ. रघुनाथ माशेलकर, मृदुला बेळे, गिरीश कुबेर, राजीव खांडेकर, अंबरीश मिश्र, विनय सहस्रबुद्धे, झाकीर हुसैन, गुलजार ... यादी खूप मोठी आहे. चाळीस नामवंत लेखक, शास्त्रज्ञ, कलावंतानी त्यांना भेटलेल्या ‘आठवणीतल्या व्यक्ती’विषयी लिहिलेल्या लेखांनी ऋतुरंगचा अंक एकदम भारदस्त ठरणार आहे.

### स्वरप्रतिभा

हा अंक जागवणार आहे, गाण्यांच्या आठवणी. ह्या गाण्यांना भाषेचे बंधन नाही. टकीला, वाकावाका, कम सप्टेंबर, हॅप्पी बर्थडे यासारख्या जगभर गाजलेल्या सुरावटी पासून ‘नाच रे मोरा’ व्हाया अनेक हिंदी–मराठी गाणी असा आठवणींचा खजिना इथे सापडेल. गाण्यांशी जोडलेल्या कथा, त्यांची खासियत वाचताना साहजिकच वाचक सुध्दा ती गुणगुणणार हे नक्की. अभिनेत्री आशा काळे आणि ज्येष्ठ गायिका आशाताई खाडिलकर अशा दोन आशांच्या मुलाखती हे अजून एक वैशिष्ट्य. आशा काळे बोलल्या आहेत, त्यांच्यावर चित्रित झालेल्या गाण्यांविषयी. पुष्पा पागधरे

यांची हिंदी गीते आणि तत्संबंधित मुलाखतही इथे असेल.

या सोबतच आठवणीतील काही अनवट माहितीने अंक संग्राह्य सुद्धा होणार आहे. उदाहरणार्थ : अभिनेते अमिताभ बच्चन, सचिन पिळगांवकर, नूतन, प्रसाद ओक, सुनील बर्वे आणि क्रिकेटपटू सुनील गावस्कर तसेच पद्माकर शिवलकर यांनी गायलेल्या गाण्यांची आठवण आणि बरंच काही!

**अक्षरधन**

प्रा. अशोक चिटणीस, प्रा. शुभा चिटणीस, एकनाथ आव्हाड, अरुण म्हात्रे, सुमन नवलकर, सुरेश सावंत, माधुरी बुधकर अशा अनेक मान्यवरांच्या साहित्याने नटलेला, अनेक नवोदित कवींच्या कवितांचा समावेश असलेला हा अंक आहे. ♦

# विलेपार्ले विभागात वार्षिक मेळावा संपन्न

**– अंजली खरे**

९ जुलै २०२३ रोजी विभागाचा वार्षिक मेळावा संपन्न झाला. उपस्थिती होती, सुमारे १२०.

विभागातील १०वी उत्तीर्ण-विद्यार्थ्यांना देण्यात येणारे २०२० ते २०२३ ह्या कालावधीसाठीचे कै. भाऊ मामा गोगटे पुरस्कार यावेळी वितरित करण्यात आले.




विशेष कामगिरी केलेल्या कौतुकाचे यंदाचे मानकरी होते अक्षय राजीव खांडेकर, प्रसाद यशवंत कोचरेकर. अक्षय खांडेकर याने ७ सायकलपटूंसह काश्मिर ते कन्याकुमारी प्रवास, ५ फेब्रुवारी ते ५ मार्च २०२३ या कालावधित सायकलवरून केला. प्रसाद कोचरेकर यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार शैक्षणिक व सामाजिक कार्यासाठी मिळाला आहे. आलोक हर्डीकर यांनी प्रमुख पाहुणे मा. मुकुंद चितळे व मेळावा अध्यक्ष ज्योति मोडक यांचा परिचय करून दिला. मुकुंद चितळे सरांनी त्यांच्या भाषणात CA चा व्यवसाय करताना, आलेल्या ग्राहकांचे हित त्यांनी कसे जोपासले, याचे अनुभव कथन केले. तसेच व्यवस्था सुधार (System Correction) करण्याचा यशस्वी प्रयत्न त्यांनी केला. तो म्हणजे भारतातील विद्यार्थी CA झाल्यावर भारतभर प्रॅक्टीस करू शकतो. पण लंडनमध्ये गेला तर तिथली परीक्षा द्यावी लागते. लंडनमधील CA ला भारतात प्रॅक्टीस करता येते. या धोरणास प्रश्न विचारून परदेशातून आलेल्या विद्यार्थ्यांनी इथेही परीक्षा दिली पाहिजे, हा बदल करून घेतला.

ज्योती मोडक यांनी संस्थेची माहिती दिली. १९७५ सालापासून आजतागायत संस्थेने ग्राहक हितार्थ राबविलेल्या विविध मोहिमा, प्रकल्प यांचा सविस्तर आढावा घेतला. समारोप करतांना 'हा जगन्नाथाचा रथ पुढे नेण्यासाठी तरुण कार्यकर्त्यांची आवश्यकता आहे, बदलत्या तंत्रज्ञानानुसार काम करण्याची गरज आहे,' असे मत व्यक्त केले.

विभागाचे अध्यक्ष डॉ. गिरीश जाखोटिया यांनी उपस्थितांना संबोधित करताना आपली संघटना व संस्था Organisation च्या पुढे जाऊन Institution होऊ शकेल का, हा सर्वांनी विचार करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. मार्गदर्शक अजित जोशी यांचा परिचय बीना पितळे यांनी करून दिला. 'Digital ग्राहक जागा हो' या विषयावर त्यांनी बहुमोल मार्गदर्शन केले.

महाराष्ट्र गीताने प्रारंभ व राष्ट्रगीताने मेळाव्याची सांगता झाली. सूत्रसंचालन अंजली पोतदार यांनी केले. आभारप्रदर्शन आदिती जोशी यांनी केले.

♦

# मुंबई ग्राहक पंचायत

(सार्वजनिक न्यास नोंदणी क्रमांक : एफ – ७००० मुंबई) • सोसायटी रजि नं. ४१७/४१३१३५०
ग्राहक भवन, संत ज्ञानेश्वर मार्ग, जे.व्ही.पी.डी. मार्केट, विलेपार्ले (पश्चिम), मुंबई – ४०० ०५६.
दूरध्वनी : (०२२) २६२८ १८३२/२६२८ १८३९ • Email : mpanchayat@gmail.com

## ४२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

(२०२२–२३)

## सूचना

मुंबई ग्राहक पंचायतीच्या सभासदांची ४२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे अध्यक्ष डॉ. बाळ फोंडके यांच्या अध्यक्षतेखाली रविवार, दि. ८ ऑक्टोबर २०२३ रोजी, ग्राहक भवन येथे दुपारी ३.०० वा. आयोजित करण्यात आलेली आहे. सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

## सभेपुढील कामकाज

१. सभेची सूचना वाचणे.

२. रविवार, दिनांक ९ ऑक्टोबर २०२२ रोजी घेण्यात आलेल्या ४१व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून त्यास मंजुरी घेणे.

३. मुंबई ग्राहक पंचायतीचा १ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३ या कालावधीचा कार्य अहवाल सादर करून, त्यास मान्यता घेणे.

४. सन २०२२–२३ या वर्षाच्या लेखापरीक्षीत हिशेबाची पत्रके, ताळेबंद, हिशोब तपासणीचा अहवाल सादर करणे व मंजूर करणे.

५. १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ या काळाकरिता वैधानिक हिशोब तपासनिसाची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.

६. २०२३–२४ या आर्थिक वर्षांसाठी कार्यकारिणीने सादर केलेले अंदाजपत्रक मंजूर करणे.

७. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळचे विषय.

दिनांक : १ सप्टेंबर २०२३


**अनिता खानोलकर**
कार्यवाह

**सूचना –**

१) नियत गणसंख्येच्या (मतदानाचा हक्क असणारे ५० सदस्य) अभावी सभा तहकूब झाल्यास ही सभा त्याच दिवशी त्याच स्थळी दुपारी ठीक ३.३० वाजता घेण्यात येईल. त्या सभेस गणसंख्येचे बंधन असणार नाही.

२) वार्षिक अहवाल आणि हिशेबाबाबत कोणतेही प्रश्न असल्यास संबंधितांनी सभेच्या किमान पाच दिवस आधी कार्यवाहांना ग्राहक भवनच्या पत्त्यावर लेखी कळवावे.

३) संस्थेचा ४२वा वार्षिक अहवाल मुंबई ग्राहक पंचायतीचे ग्राहक भवन, पार्ले गोडाऊन, ठाणे वितरण केंद्र, पालघर वितरण केंद्र, रायगड वितरण केंद्र (पेण), वसई वितरण केंद्र व पुणे वितरण केंद्र येथे सभासदांच्या अवलोकनार्थ सोमवार दि. २५ सप्टेंबर २०२३ पासून उपलब्ध असेल.



मस्त मिलेट

# राजगिरा (Amaranth)

– डॉ. वासन्ती श्री.पुरोहित
*(कोरडवाहू शेतीचे उत्पादन आणि दर्जा वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर या विषयावर पीएचडी)*

**रा**जगिऱ्यात असलेल्या पौष्टिक गुणधर्मामुळे धान्यपीक नसले तरी तिचे वर्गीकरण श्रीधान्यामध्ये केले जाते.

राजगिऱ्याचा दाणा आणि पाने (पालेभाजी) दोन्हीचा समावेश जगभरात अन्नसेवनात केला जातो. भारतामध्ये विविध उपवास असताना राजगिऱ्याचे सेवन केले जाते. मराठीत राजगिरा, गुजराथीमध्ये राजगारो, हिंदीमध्ये रामदाना अशी नावे धान्याला आहेत. तर पालेभाजीच्या प्रजातीनुसार मराठीत चवळई, तांदुळजा, लाल आणि हिरवा माठ, बंगाली भाषेत लाल शाक व नोटे शाक, तामिळमध्ये मुलाई कीराई, हिंदीमध्ये चवळई, तेलुगूमध्ये थोलाकुरा, मल्याळममध्ये चीरा, कन्नडमध्ये हरिवे म्हणून संबोधली जाते.

राजगिरा हे वर्षायु पीक असून पालेभाजी, शोभिवंत झाडे आणि धान्यसदृष्य पीक म्हणून याची लागवड केली जाते. राजगिऱ्यामध्ये मुख्य मुळाला फुटणारी उपमुळे जमिनीत खोलवर जातात. यामुळे जमिनीचा सामु (PH), क्षारता, वातावरण, तापमान आणि दुष्काळसदृष्य स्थितीमध्ये राजगिरा तग धरू शकते. या वनस्पतीच्या जगभरात साधारणपणे ७५ प्रजाती आढळून येतात. या प्रजातींपैकी १० प्रजाती ह्या उत्तर अमेरिकेतील असून त्यांची नर व मादी फुले वेगवेगळ्या झाडांवर असतात. (उदा. पपई) ज्याला इंग्लिशमध्ये डाईशस (Dioecious) म्हणतात. तर इतर ६५ प्रजाती या जगातील सर्व खंडांमध्ये (उष्ण कटिबंधीय प्रदेशातील पठारापासून ते हिमालयापर्यंत) आढळून येतात.





१३०० ते १५२१ च्या काळात मेक्सिकोमध्ये राजगिरा पिकाची लागवड सुरू झाली, तेथील लोकांचे प्रमुख धान्यपीक म्हणून याची गणना केली जात असे. एवढी पूर्वीपासून लागवड होत असूनही राजगिऱ्यावर संशोधन मात्र १९७० च्या दशकात अमेरिकेत सुरू झाले.

रुजण्यासाठी लागणारा दीर्घ काळ, या पिकाची झपाट्याने होणारी वाढ आणि मोठ्या प्रमाणावर होणारे बीजोत्पादन हे राजगिऱ्याचे वैशिष्ट्य! राजगिऱ्याच्या १०० ग्रॅम दाण्यांमध्ये ३६७ उष्मांक, ६६ ग्रॅम कर्बोदके, १३ ते १४ ग्रॅम प्रथिने, ५.३ ग्रॅम मेद, ४ ग्रॅम तंतूमय पदार्थ, ३०३ मिग्रॅ कॅल्शियम, स्फुरद, पोटॅश, मॅग्नेशियम, लोह, मँगनीज, जस्त, तांबे, सेलेनियम या पोषकतत्वांबरोबरच ब आणि ई जीवनसत्व आणि थायमिन यामुळे या वनस्पतीचे मानवी आहारात महत्त्व वाढले आहे. पालेभाजीमध्ये कॅल्शियम, बिटा कॅरोटिन, पोटॅश, मॅग्नेशियम, फॉलिक ॲसिड, ब आणि क जीवनसत्व अधिक आहे. मधुमेहींसाठी याचे सेवन योग्य मानले जाते. शरीरातील एलडीएल कोलेस्टेरॉल कमी करण्याचे वैशिष्ट्य ह्या पिकात आहे.

ॲंटिइन्फ्लमेटरी आणि ॲंटिऑक्सिडंट गुणधर्मामुळे जास्तीचे वजन घटविण्यासाठी याचा उपयोग होतो, परंतु एकावेळेस ५० ग्रॅम पेक्षा जास्त खाऊ नये. थोड्या प्रमाणात सेवन केले तरी पोटभरीचे होते. ग्लुटेन फ्री, कॅल्शियमच्या अधिक प्रमाणामुळे हाडांच्या बळकटीसाठी राजगिरा योग्य आहे. लोहाचे प्रमाण अधिक असल्याने गरोदर महिला आणि बालकांसाठी योग्य, यातील जीवनसत्व, खनिजद्रव्याच्या प्रमाणामुळे त्वचा आणि केस यासाठी उत्तम मानले जाते. पचायला हलके असल्याने लहान मुले, वयस्क व्यक्ती यांच्यासाठी योग्य!

राजगिऱ्याचा दाणा १ ते १.५ मिमिचा गोलाकार असतो. आशिया आणि अमेरिका खंडात राजगिरा आणि त्याचा भाऊबंद – किनवा (Quinoa)च्या अनेक प्रजातींची लागवड धान्यासाठी म्हणून केली जाते. भारताच्या अनेक दुर्गम भागात राजगिऱ्याची लागवड केली जाते.



राजगिऱ्यापासून तयार केलेले लाडू, वड्या, उपवासाच्या भाजणीमध्ये असलेला त्याचा समावेश, त्यापासून तयार केली जाणारी भाकरी, पुऱ्या, लापशी, खीर हे प्रकार तर आपल्या नेहमीच्या सेवनातले पदार्थ! परंतु कणकेमध्ये राजगिरा मिसळून सिरिअल्स, क्रॅकर्स, कुकीज, ब्रेड आणि बेकरीतील इतर पदार्थही बनवले जातात.

राजगिऱ्याच्या लाह्या दूध-गुळाबरोबर किंवा ताकात तिखट, मीठ फोडणी घालून नाश्त्याला खायचा प्रघात कर्नाटकात आहे. राजगिऱ्याची बर्फी, न्युट्री बार, केरळमध्ये होणारा थोरन - चीरा हे काही वेगळे पदार्थ!

असा हा पौष्टिक, गुणकारी राजगिरा केवळ उपवासासाठी न वापरता रोजच्या आहारातही त्याचा समावेश करावा. ♦

# आणि कापडी पिशव्या सजल्या!

**– नेहा जोशी**

**गो**रेगाव विभागातर्फे २० ऑगस्ट रोजी 'टोट बॅग पेंटिंग कार्यशाळा' आयोजित करण्यात आली होती. सुमारे ३० जण त्यात सहभागी झाले. कापडावर रंगकाम करून पर्यावरणपूरक पिशवी वापरता येईल किंवा भेट देताना स्वहस्ते सजवून दिलेल्या कापडी पिशव्या नक्कीच वहावा मिळवतील आणि जपून वापरल्याही जातील, असे कार्यशाळेत सहभागींना समजावून सांगितले. नेहा जोशी यांनी ठसे, स्टेन्सिल्स वापरून तसेच मुक्तहस्त चित्रे चितारुन पिशव्या रंगवण्याचे कलात्मक प्रशिक्षण दिले. जास्तीत जास्त लोकांना कापडी पिशव्या वापरण्याचे आवाहन करण्यात आले. हा उपक्रम गोरेगाव पेठ एप्रिल २०२३ मध्ये हाती घेण्यात आला. आतापर्यंत तीन कार्यशाळेत मिळून एकूण सुमारे १०० जण सहभागी झाले. ह्यात वयवर्षे ९ ते ७३ अशा सर्वांनी सहभाग नोंदवला. 'आम्ही ४० वर्षांनी हातात ब्रश धरला; शाळेच्या आठवणी जाग्या झाल्या, ते दोन तास कसे गेले ते कळलेच नाही,' अशा बोलक्या प्रतिक्रियाही अनेक मिळाल्या. हेच खरे तर ह्या उपक्रमाचे संचित!



**गोरेगाव कार्यशाळेत सजलेल्या पिशव्या**

♦

# Market is up, but my portfolio is down

**- Abhay Datar**

The stock exchanges over the world crashed heavily in the last week of March 2020 after the declaration of 'Lock Down' due to Covid19 pandemic. Now Indian stock exchanges, namely, the National Stock Exchange (NSE) and the Bombay Stock Exchange (BSE) are scaling new highs almost every day, barring a few hiccups. Both the indices, namely Nifty and Sensex have bounced back by almost 250% in a little more than 3 years. Does this rise reflect into our portfolio? There will be two scenarios; my portfolio has outperformed or my portfolio has underperformed as compared to the indices. However, the terms 'market is up' and 'my portfolio is down' are very vague. Let us understand what exactly does this mean and how the performance is different from each other.

In simple terms 'Market is up today' means the main indices, Sensex of the BSE and Nifty of the NSE are up. It does not necessarily mean that all the shares have moved up. Some have advanced, some have declined while some have remained almost flat. This real-time data is available on the websites of both the NSE and the BSE. Both these bourses contain not only the main index but also various other sectoral indices related to industries like auto, engineering, infrastructure, information technology, pharmaceuticals, banking & finance, FMCG (fast-moving consumer goods like packaged goods, cosmetics, soaps, toothpaste, and such other household items). Each of these sectors is having a separate index. For example, the auto sector contains Tata Motors, Mahindra, Hero MotoCorp, and also allied industries like Banco Products, which manufacture and supply auto ancillaries. If there is some positive news for the auto sector, all the shares may go up but with different percentages for various reasons. The average rise will reflect as the index of the auto sector. Similarly, if the budget offers certain concessions in exports and imposes duties on certain imports, shares of the relevant export-oriented companies will go up, whereas those who mainly depend upon imports will come down. The performance of Information Technology companies has remained lukewarm post Covid19 and has not given expected returns because most of the companies have either postponed their I.T.-related projects or have altogether cancelled them as a cost-cutting measure.



However, such movement will not be the same across all companies in that sector. This is because every company within that sector has a different structure, management capacity, financial strength, and other factors. The performance of each company depends upon such factors. So, the performance of our portfolio depends largely upon the performance of the companies we have invested in and not

entirely upon the market movement.

Same is the case with our investment in various Mutual Funds. There are many schemes. Equity, Balanced, Bond, and Liquid funds are the main segments. Again, the equity fund itself will have large-cap, mid-cap, small-cap, multi-cap, etc., and the performance will be different from each other. The performance of every scheme also depends upon the skill of the fund manager. Even if we consider only gold-traded funds, the performance of each fund house will be different. Those who have invested in Bond funds or liquid funds to avoid high risk, may experience such adverse movement particularly because of the very low volatility in this market.

So, if you are worried about the performance of your investment, check the above factors. Every mutual fund mails a monthly factsheet to us. It is of great help to understand the investment pattern of the scheme because it contains the names of the companies in which the investment is made. It also gives a percentage of each invested amount to the total investment. As vigilant investors, we should study these facts. The details are neither too technical nor too complex. On the other hand, studying these facts will enrich our knowledge and we need not depend solely on our mutual fund advisor. So, happy investing.

♦

# Housing Societies Queries

**- Sharmila Ranade**

**Our Activist Sharmila Ranade writes a column in Free Press Journal every Monday. She answers the queries received by the readers. We have reproduced this for our readers.**

*The Accounts of our Society have not been maintained properly for the last two years post covid and as such AGM has never been conducted for three consecutive years. What action can be initiated against the Managing Committee?*

Ans.: Every Society is supposed to convene the AGM on or before 30th September each year. On 28.03.2022 another proviso was added to Section 75(1) of the MCS Act, empowering the Registrar to grant an extension to three months to conduct AGM on account of infectious diseases, pandemic, flood heavy rains, etc. by way of a special or general order. However, for the financial year 2019-2020 and 2020-2021 additional time of 9 months had been granted to get the books of accounts audited and call for the AGM within 12 months from the close of the financial year. If the AGM is not called by the Society, the Registrar may call such meeting in the prescribed manner and that meeting will be deemed to be AGM duly called by the Society and the Registrar may order that the expenditure incurred in calling such a meeting shall be paid out of the funds of the Society or by such person/s who were responsible for the refusal or failure to convene the AGM. Registrar may further disqualify such person responsible for being elected and for being any officer or member of any committee for such period not exceeding 5 years. If the responsible officer is a servant of the Society, Registrar may impose a penalty up to Rs. 5000. An opportunity of being heard shall be given to such person before passing any order by the Registrar.

♦

# MGP takes its 'Mission Global ODR' to Germany

**- Adv. Pooja Joshi-Deshpande**

I was honoured to co-author and present a research paper titled as 'Global ODR - Smart Dispute Resolution - Opportunities & Challenges' along with our Chairman Adv. Shirish Deshpande Sir at the 18th IACL Conference in Hamburg.

The 3-day Global Conference with the theme of 'Unanswered Questions in Consumer Laws' was organised by the International Association of Consumer Laws (IACL). The IACL, an international body of Consumer Law experts, practitioners, scholars, and academia, had invited Research Papers from all over the world on the above theme. I had the honor of working with Adv. Shirish Deshpande to work on this Research Paper. We were delighted when we were informed by IACL that our Research paper was accepted by them and that we have to present the said Paper at the Global Conference being held in Hamburg from 19th to 21st July.

In our paper we analysed the effectiveness of the Global ODR mechanism and why it is needed for e-commerce dispute resolution. Our paper briefly dealt with how the ODR process works, its advantages, and how it is beneficial for consumers. Its features like simplicity, speed, convenience, and affordability have been emphasised when compared with ADR and traditional litigation.

Our paper also covered areas like challenges in implementing ODR, the main challenge being cross-border jurisdiction. The process has been criticized as lacking face-to-face interaction, language barrier, security and confidentiality issues, etc. Our paper focussed on how Global ODR, with its beneficial features in E-Commerce disputes, lessens the burden on the traditional Justice delivery system. With the help of the latest modern technology of AI & Blockchain, the Global ODR mechanism has the potential to revolutionise dispute resolution into Smart Dispute Resolution. It will lead to the creation of Global ODR. The Paper also highlighted the initiatives being taken in several countries including India and regional groups like ASEAN, APEC, and OECD in introducing Online Dispute Resolution (ODR). The Paper brings into sharp focus the appeal of the United Nations General Assembly to its Member States to adopt ODR for Dispute Resolution in the E-com sector.

The IACL was founded to foster learning and debate on consumer issues and law. I learned many things from the other participants.

*(Cont. Page No. 23...)*



# MGP's Suggestion Finds Place in Revised Mediation Bill

Mediation Bill, 2021 had provided for mandatory pre-litigation mediation. This means that before filing any civil dispute, it would be first necessary to go through mandatory Mediation.

In our suggestions to the Govt., MGP had opposed mandatory pre-litigation Mediation because it adds to the cost as well as leads to further delay and hence suggested optional pre-litigation mediation.

I am happy to share that the Parliamentary Committee also made a similar




suggestion to the Government and now even the Government has agreed to make the pre-litigation mediation optional. ♦

*(...Previous Page No. 22)*

## MGP takes its 'Mission Global ODR'...

The goal of the IACL conference was to develop research networks and stimulate research and joint research projects in the area of consumer law and policy and consumer relations, covering all regions of the world. The IACL conferences are held once every two years in different parts of the world.

It was one of the biggest IACL conferences. As many as 32 parallel workshops were held on various topics related to consumer law. This was an amazing experience to share knowledge, do research, and in turn, learn so much. From this conference, the view that I want to share is that “there is an urgent need to find solutions and answers to the challenges and unanswered questions of consumer law”. Such conferences, presentations would pave the way for the younger generation like me.

A couple of presentations in this Conference deserve a special mention.

Shanika Whitehurst and Kristen Purcell from Rutger University shared their survey research on consumer perceptions of and experiences with, product repairability in the US and highlighted multiple wins that Consumer Reports and their coalition partners have had advocating for Right to Repair legislation in state houses across the US. Gitta Veldet (Asst. Professor) (Leiden University) shared the panel with other participants on product liability.

Anne Marie Weber with Weronika Herbet-Homenda and Helena Kordasiewicz, presented a project titled "The digital exclusion of the Elderly from financial services".

Betty from the University of Autonoma shared a panel with us and presented a Paper on “ODR - Access to Justice & Protection of Consumer Rights in E-Commerce”. Prof Dr. Heesok Seo (Korea) presented his paper on "Civil Liability of E-Commerce” which focused on P2C Relations. He explained platform liability under Korean Law, and recent regulatory trends in Korea.

All in all, it was an enriching and refreshing experience to attend the IACL Conference. The Conference has empowered me further to work for MGP with vigour and vision. ♦

• Postal registration No. MCN/158/2023-2025 • WPP License No. MR/TECH/WPP-137/North/2023-2025
• License to post without prepayment, on 5th & 6th • Vile Parle (W) P.O. Mumbai 400 056 RNI No. MAHBIL/2011/39044



# चेंबूर येथे प्रथमच पंचायत पेठेचे आयोजन

– **अनुराधा देशपांडे**, *अध्यक्ष, पंचायत पेठ समिती*

**दु**सऱ्या टप्प्यातील पंचायत पेठांचा शुभारंभ पालघर येथे आयोजित ग्राहक पंचायत पेठेने झाला. ८३ लाखांची विक्रमी उलाढाल ह्या पंचायत पेठेत झाली. ह्या उत्तम प्रतिसादानंतर यंदा प्रथमच आपण चेंबूर येथे ग्राहक पंचायत पेठेचे आयोजन करत आहोत. **दि. ८ सप्टेंबर ते १२ सप्टेंबर ह्या कालावधीत स्वामी मुक्तानंद हायस्कूल, एल.यु. गडकरी हॉल, एन.जी.आचार्य मार्ग, सुभाष नगर, चेंबूर (पू.)** येथे ही पेठ संपन्न होईल. **चेंबूर येथे प्रथमच संपन्न होणाऱ्या पंचायत पेठेसाठी** कार्यकर्ते आणि गाळेधारक सज्ज झाले आहेत. आता प्रतिक्षा आहे ती आपल्या प्रतिसादाची.

आणि तो भरभरून मिळेल ह्याची खात्री आहे. तेव्हा चेंबूरच्या ह्या पेठेला भेट देण्यासाठी पंचायत पेठ समितीतर्फे आग्रहाचे निमंत्रण.

२०२३-२४ ह्या वर्षातील तिसऱ्या टप्प्यातील पंचायत पेठेचा शुभारंभ **३० सप्टेंबर २०२३ पासून दादर येथे सूर्यवंशी हॉल** मध्ये होत आहे. विविधरंगी विविधअंगी बहरलेल्या ह्या पंचायत पेठ उपक्रमाचा आरंभ हा नेहमीच गणेशोत्सवानंतर पितृपंधरवड्यात होतो. वर्षभर आतुरतेने वाट पाहणारे असंख्य ग्राहक ह्या पंचायत पेठेला भेट देतात. ह्या वर्षीही ग्राहकांची उत्सुकता लक्षात घेऊन अनेक नवीन स्टॉल आपल्या भेटीला येत आहेत. गेली काही वर्षे आपल्याला न भेटलेला **'आनंदवन'**चा स्टॉल ह्या वर्षी दादर येथील पंचायत पेठेत आपल्या भेटीला येत आहे. तेव्हा अवश्य भेट द्या.

आपण ह्या पंचायत पेठेला भेट देऊन आपली सणासुदीची आणि लग्नसराईची खरेदी नक्की कराल ह्याची खात्री आहे. ह्या पेठेला आणि पुढेही ठाणे, अंधेरी, वसई आणि बोरीवली येथील पंचायत पेठांना भेट देण्यासाठी हे पंचायत पेठ समितीतर्फे आग्रहाचे निमंत्रण. ♦

# सेतू बांधा रे!

– **अनुराधा देशपांडे**, *अध्यक्ष, पंचायत पेठ समिती*

**ऑ**गस्ट २०२३च्या 'ग्राहक तितुका मेळवावा'मध्ये **'सेतू बांधा रे!'** उपक्रमाची माहिती छापून आली आणि ह्या उपक्रमाची विचारणा करणारे अनेक फोन आले. आपल्या अनेक सदस्यांनी त्यांच्या माहितीतल्या संस्थांची माहिती कळवली. आणि क्षणभर मनात आले अरे असे कितीतरी डोळे अपेक्षेने समाजाकडे बघताहेत. ह्यांना दया नको तर समाजाची मान्यता हवी आहे. स्वाभिमानाने आणि सक्षमतेने समाजासमोर यायचे आहे. फक्त गरज आहे ते आपण त्यांना फक्त आधाराचा हात देण्याची. आपला उपक्रम ह्या संस्थांना बळ देणारा ठरेल.



तेव्हा मंडळी **२१ आणि २२ ऑक्टोबरला सिंफनी बँक्वेट, सहार रोड, अंधेरी (प.)** येथे संपन्न होणाऱ्या 'सेतू बांधा रे!' प्रकल्पाला नक्की भेट द्या. आपली ह्या वर्षाची दीपावली ह्या संस्थांकडील उत्पादने खरेदी करून साजरी करूया! पाकिटे, पणत्या, तोरणे, वारली पेंटींग पिशव्या, आकाश कंदील, सुंदर सुंदर कलात्मक उत्पादने बघाल तर हरखून जाल.

आपला ऑक्टोबर २०२३ चा ग्राहक तितुका मेळाववाचा पंचायत पेठ विशेषांक असणार आहे. ह्या अंकातून ह्या संस्थांची सविस्तर माहिती मिळेल. ही उत्पादने खरेदी करायला, ह्या संस्था जाणून घ्यायला आपण नक्की भेटूया **२१ आणि २२ ऑक्टोबरला, सिंफनी बँक्वेट, विजय नगर, अंधेरी (पूर्व) येथे सकाळी ११ ते रात्रौ ८.३० या वेळेत.** ♦